# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (TAIT)-2025 ऑन-लाईन परीक्षेसाठी माहिती पुस्तिका**

उमेदवार देणार असलेल्या ऑन-लाईन परीक्षेच्या विविध पैलूंचा तपशील आणि संबंधित बाबीसंबंधात महत्वाच्या सूचना या पुस्तिकेत आहेत. परीक्षेची तयारी करण्यात मदत व्हावी म्हणून उमेदवारास या पुस्तिकेचे नीट अध्ययन करण्यास सुचविले जात आहे.

खाली दर्शविल्याप्रमाणे ऑन-लाईन परीक्षेत वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या बहुपर्यायी प्रश्नावल्या असतील.

| अनुक्रमांक | विभाग | प्रश्न संख्या | कमाल गुण | कालावधी |
|---|---|---|---|---|
| A | अभियोग्यता | 120 प्रश्न | 120 | 120 मिनिटे |
| B | बुद्धिमत्ता | 80 प्रश्न | 80 | |
| | एकूण | 200 | 200 | 120 मिनिटे |

कृपया लक्षात घ्या: परीक्षेचे स्वरूप सर्वग्राही (Omnibus) असेल. प्रश्नपत्रिकेत कोणतेही विभाग/उपविभाग असणार नाहीत.

परीक्षेसाठी 120 मिनिटांचा अवधी आहे, तरीसुद्धा उमेदवारास परीक्षास्थानी साधारणतः 180 मिनिटे थांबावे लागेल ज्यामध्ये नोंद होणे (logging in), प्रवेशपत्र गोळा करणे, सूचना देणे इ. साठी लागणा-या कालावधीचासुद्धा समावेश आहे. भाषिक क्षमता (इंग्रजी) आणि भाषिक क्षमता (मराठी) व्यतिरिक्त सर्व प्रश्नावल्या, उमेदवाराने अर्ज भरतेवेळी निवडलेल्या द्विभाषी माध्यमात (मराठी- इंग्रजी किंवा उर्दू- इंग्रजी भाषेत) उपलब्ध असतील. दिलेल्या 120 मिनिटांच्या कालावधीत उमेदवार कोणताही प्रश्न सोडवू शकतात. सर्व प्रश्नांना बहुपर्याय असतील. प्रश्नासाठीच्या चार उत्तरांपैकी, फक्त एकच अचूक उत्तर असेल. **उमेदवारास सर्वाधिक अचूक उत्तराची निवड करावयाची आहे आणि उमेदवारास वाटत असलेल्या योग्य/अचूक पर्यायावर 'माउस-क्लिक' करावयाचा आहे. उमेदवाराने क्लिक केलेला पर्याय ठळकपणे दर्शविला जाईल आणि त्यास उमेदवाराचे त्या प्रश्नाचे उत्तर म्हणून गणले जाईल. उमेद्वाराने दर्शविलेल्या चुकीच्या उत्तरासाठी नकारात्मक गुणांकन केले जाणार नाही. तथापि उमेद्वारांना सल्ला दिला जातो की त्यांनी अंदाज लावून उत्तर देणे टाळावे.**

**कृपया लक्षात घ्या की या पुस्तिकेत दिलेले प्रश्नांचे प्रकार हे उदाहरणादाखल आहेत आणि सर्वसमावेशक नाहीत. प्रत्यक्ष परीक्षेत तुम्हाला यापैकी काही किंवा सर्व प्रकारांचे अधिक काठीण्य पातळीचे प्रश्न आढळतील, शिवाय या ठिकाणी नमूद न केलेल्या इतर प्रकारांवरही प्रश्न आढळतील.**

काही नमुना प्रश्न खाली दिले आहेत.

## SAMPLE QUESTIONS

**निर्देश प्र.**1-3 : **खालील प्रत्येक प्रश्नात एक संख्या दिलेली नाही, त्या न दिलेल्या संख्येच्या जागी प्रश्नचिन्ह** (?) **दर्शविले आहे. तुम्हाला** (1), (2), (3) **आणि** (4) **या उत्तरांपैकी कोणते उत्तर प्रश्नचिन्हाच्या जागी येऊ शकते ते शोधावयाचे आहे.**

**प्र.**1. 42 + 73 + 137 = ?
(1) 352 (2) 252 (3) 242 (4) 142

**प्र.**2. $20 \times \frac{1}{2} = ?$
(1) 4 (2) 5 (3) 10 (4) 18

**प्र.**3. 0.7 x 0.5 = ?
(1) 35 (2) 0.35 (3) 0.0035 (4) 0.035

**प्र.**4. जर एका लिंबांची किंमत 10 पैसे तर 6 लिंबांची किंमत किती पैसे ?
(1) 6 (2) 10 (3) 60 (4) 610

**प्र.**5. खालीलपैकी कोणत्या संख्येस 4 ने निःशेष भाग जातो ?
(1) 27114 (2) 58204 (3) 48402 (4) 32286

**प्र.**6. खालीलपैकी डावीकडील पहिल्या स्तंभात नाव आणि पत्त्याचे एक संयोजन दिलेले असून, त्यानंतर 1, 2 आणि 3 या स्तंभाखाली प्रत्येकी एक अशी तीन संयोजने दिली आहेत. तुम्हाला पहिल्या स्तंभात असलेल्या संयोजनाच्या हुबेहूब सारखे संयोजन शोधायचे आहे. ते संयोजन असणाऱ्या स्तंभाचा क्रमांक हे उत्तर आहे. जर सर्वच संयोजने वेगवेगळी असतील, तर उत्तर '4' आहे.

| | **1** | **2** | **3** | **4** |
|---|---|---|---|---|
| S. R. BHAT<br>36, Bora Street<br>Bombay–400096 | S. R. BHAT<br>63, Bora Street<br>Bombay–400096 | S. R. BHATT<br>36, Bora Street<br>Bombay–400096 | S. R. BHAT<br>36, Bora Street<br>Bombay–400069 | None |

**प्र.**7. पुढील प्रश्नात, शब्द किंवा नावांची इंग्रजी मुळाक्षरक्रमाने रचना केल्यानंतर कोणता शब्द किंवा नाव **शेवटी** येईल?

(1) Bread (2) Brush (3) Broad (4) Buffer

**Q.8-10. Directions :** Pick out the most appropriate word from amongst the words given below each sentence to complete it meaningfully.

**Q.8.** He quickly glanced .............................. the book to find what it said about the Indian economy.

(1) at (2) through (3) in (4) to

**Q.9.** The counsel urged the court to ........................... down the obnoxious law.

(1) enact (2) enforce (3) cancel (4) strike

**Q.10.** The local official ........................... the Minister of the situation.

(1) explained (2) warned (3) apprised (4) told

**Q.11-13. Directions :** Read each sentence to find out whether there is any grammatical error in it. The error, if any, will be in one part of the sentence. The number of that part of the sentence is your answer. If there is no error, the answer is No error.

**Q.11.** I am twenty two years old / when I first / joined the bank. No error

(1) (2) (3) (4)

**Q.12.** To the Hindus / the Ganga is holier than / any other river. No error

(1) (2) (3) (4)

**Q.13.** Of all the teachers / in our school / our class teacher were very strict. No error

(1) (2) (3) (4)

**प्र.14** पुढील प्रश्नात वाक्याचे तीन भाग पाडले आहेत. व्याकरणाच्या, वाक्यरचनेच्या किंवा भाषेच्या दृष्टीने वाक्य सदोष असल्यास, कोणत्या भागात दोष आहे ते ठरवून त्या भागाचा क्रमांक उत्तर म्हणून द्या. वाक्य निर्दोष / बिनचूक असल्यास उत्तर "(4)" द्या.

इंग्लंडमधून जन्मलेल्या / कुसुमाग्रजांना शेक्सपियर म्हणतात / व हिंदुस्थानात जन्मलेल्या शेक्सपियरांना कुसुमाग्रज म्हणतात

(1) (2) (3)

निर्दोष

(4)


**प्र.15**. पुढे काही शब्द दिले आहेत. त्यांचा अर्थ सांगणारा एक शब्द दिलेल्या पर्यायातून निवडा.

स्वतःच स्वतःची सर्व कामे करणारा.

(1) स्वावलंबी (2) स्वयंचलित (3) स्वकष्टार्जित (4) स्वाध्यायी


**प्र.**16 अनुक्रम पुढेही सुरू राहावा, यासाठी उजवीकडे उत्तर म्हणून दिलेल्यापैकी कोणती आकृती डावीकडे प्रश्न म्हणून दिलेल्या पाच आकृतींनंतर आली पाहिजे?




प्रश्न आकृती:                    उत्तर आकृती:



(1)   (2)   (3)   (4)

**प्र**.17 प्रश्नातील आकारांशी सारखीच गुणवैशिष्ट्ये सामायिक करणारा, उत्तर म्हणून सुचवलेला आकार ओळखा.



1)    (2)    (3)    (4) 

**प्र**.18 जर तुमच्या वर्गातील एक नियमित विद्यार्थी अनपेक्षित पद्धतीने वर्तन करू लागला, तर तुम्ही ____

(1) त्याचप्रमाणे वागून बदला घेणार

(2) वर्ग संपल्यानंतर विद्यार्थ्याशी चर्चा करणार आणि त्याची समस्या समजून घेण्याचा प्रयत्न करणार

(3) परिस्थितीकडे दुर्लक्ष करणार

(4) मुख्याध्यापकांकडे या प्रकाराची तातडीने माहिती देणार

**प्र**.19 एका शिक्षकाचे, त्याच्या/तिच्या वर्गासोबतच्या प्रभावी आंतरवैयक्तिक संभाषणासाठी ________

(1) त्याचे/तिचे विद्यार्थ्यांसोबत मजबूत नाते असले पाहिजे.

(2) तो/ती विद्यार्थ्यांच्या सारख्याच सांस्कृतिक समूहातून असायला हवा/हवी.

(3) समान प्रश्न समजून घेता यावेत, यासाठी तो/ती सारख्याच ठिकाणी राहायला असावेत.

(4) त्याने/तिने विद्यार्थ्यांना कठोर शिक्षा केली पाहिजे, ज्यामुळे ते शिस्तबद्ध होतील, ज्यामुळे संभाषण सुलभ होईल.

**प्र**.20 जर TOPS या शब्दातील अक्षरांची O पासून सुरू होणारा एक अर्थपूर्ण इंग्रजी शब्द तयार करण्यासाठी फेररचना केली, तर त्या शब्दातील शेवटचे अक्षर हे तुमचे उत्तर असेल. जर एकापेक्षा जास्त असे शब्द तयार करता येत असतील, तर M हे उत्तर आहे, आणि एकही शब्द तयार करता येत नसेल, तर X हे उत्तर आहे.

(1) T    (2) M    (3) S    (4) X

**प्र**.21-22 पुढील माहिती वाचा आणि दिलेल्या प्रश्नांचे उत्तर द्या.

P, Q, R, S, T आणि U या सहा मित्रांची जेवणाची व्यवस्था दोन ओळींत केली आहे. प्रत्येक ओळीत तीन अशा प्रकारे ते एकमेकांकडे तोंड करून आहेत. Q हा R आणि U यांच्या ओळींमध्ये नाही. P हा R च्या समोर आहे. S हा P च्या डावीकडे दुसरा आहे. T चे तोंड S कडे नाही.

**प्र**.21 P च्या लगतच डावीकडे कोण आहे?

(1) U   (2) Q   (3) S   (4) दिलेल्या पर्यायांतील एकही नाही

**प्र**.22 पुढीलपैकी कोणाची तोंडे एकमेकांकडे आहेत?

(1) Q, S   (2) S, U   (3) Q,U   (4) दिलेल्या पर्यायांतील एकही नाही

**(अ) ऑन-लाईन परीक्षेच्या स्वरूपाबद्दलचे तपशील :**

(1) परीक्षा ऑन-लाईन म्हणजेच संगणकावर घेतली जाईल.

(2) भाषिक क्षमता (इंग्रजी) आणि भाषिक क्षमता (मराठी) व्यतिरिक्त सर्व प्रश्नावल्या, परीक्षार्थ्याने ऑन-लाईन अर्ज भरतेवेळी निवडलेल्या द्विभाषी माध्यमात (मराठी- इंग्रजी/ उर्दू- इंग्रजी) उपलब्ध असतील.

(3) सर्व प्रश्नांना बहुपर्याय असतील. प्रश्नासाठीच्या चार उत्तरांपैकी केवळ एकच अचूक उत्तर असेल. **परीक्षार्थ्याला अचूक उत्तराची निवड करावयाची असून जो पर्याय उचित/अचूक वाटतोय त्या पर्यायावर 'माउस-क्लिक' करावयाचे आहे. 'क्लिक' केला गेलेला पर्याय ठळकपणे दर्शविला जाईल**

**आणि त्यास प्रश्नाचे उत्तर म्हणून समजले जाईल. एखाद्या प्रश्नाच्या उत्तरास अंतिम मुल्यांकनासाठी तेव्हाच विचारात घेतले जाईल जेव्हा उमेदवाराने 'Save & Next' वर किंवा 'Mark for Review & Next' वर क्लिक करुन उत्तर दिले असेल.**

(4) सर्वर मध्ये घड्याळ लावलेले आहे आणि तुमच्या संगणकाच्या पटलाच्या वरच्या उजव्या कोप-यातील ऊर्वरीत वेळ दर्शविणारा टाईमर परीक्षा पूर्ण करण्यासाठी शिल्लक राहिलेली वेळ दर्शवेल. जेव्हा घड्याळाची वेळ संपेल तेव्हा परीक्षा आपोआप बंद होईल. तुम्हाला स्वतःहून परीक्षा संपवण्याची किंवा थांबवण्याची आवश्यकता नाही.

(5) स्क्रीनच्या उजव्या बाजूला Question पॅलेट दाखवले जाणार असून ते खालील पैकी एक चिन्ह वापरुन प्रत्येक प्रश्नाची स्थिती दाखवेल :



**तुम्ही अजून ह्या प्रश्नापर्यंत पोहोचला नाहीत.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शवले नाही.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले आहे.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले नाही, परंतु ह्या प्रश्नाच्या पडताळणीसाठी खूण केली आहे.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले आहे, परंतु पडताळणीसाठी त्यावर खूण केली आहे.**

'पडताळणीसाठी खूण केल्याची' स्थिती निव्वळ ह्याचे स्मरण देते की तुम्ही हा प्रश्न पुन्हा पाहण्याचे ठरवले आहे. जर 'पडताळणीसाठी खूण केलेल्या' प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले असेल तर अंतिम मुल्यांकनामध्ये ते उत्तर गृहित धरले जाईल.

(6) उत्तर दर्शवण्यासाठी प्रश्न निवडायचा असल्यास आपण खालीलपैकी एक करू शकता :

- (a) थेट त्या क्रमांकाच्या प्रश्नाकडे जाण्यासाठी पटलाच्या उजवीकडील प्रश्नतालिकेमध्ये त्या क्रमांकाच्या प्रश्नावर क्लिक करा. **कृपया** लक्षात राहू द्या की हा पर्याय निवडल्यास तुमचे चालू प्रश्नाला दर्शविलेले उत्तर सुरक्षित केले जात **नाही.**
- (b) चालू प्रश्नाचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी 'Save and Next' वर क्लिक करा आणि क्रमाने पुढच्या प्रश्नाकडे जा.
- (c) चालू प्रश्नाचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी व पडताळणी साठी खूण करण्यासाठी 'Mark for Review and Next' वर क्लिक करा क्रमाने पुढच्या प्रश्नाकडे जा.

(7) तुमचे उत्तर निवडण्यासाठी दिलेल्या पर्याय बटनांपैकी एका पर्याय बटनावर क्लिक करा.

(8) तुमचे उत्तर बदलण्यासाठी दुस-या अपेक्षित पर्याय बटनावर क्लिक करा.

(9) तुमचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी तुम्हाला **'Save and Next'** वर क्लिक **करावेच** लागेल.

(10) निवडलेले उत्तर वगळण्यासाठी त्या निवडलेल्या पर्यायावर पुन्हा क्लिक करा किवा **'Clear Response'** बटनावर क्लिक करा.

(11) एखाद्या प्रश्नावर पडताळणीसाठी खूण करावयाची असल्यास **'Mark for Review & Next'** वर क्लिक करा. जर 'पडताळणीसाठी खूण केलेल्या' प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले असेल तर ते उत्तर अंतिम मूल्यांकनामध्ये ग्राह्य धरले जाईल."

(12) एखाद्या प्रश्नाचे उत्तर बदलण्यासाठी प्रथम प्रश्न निवडा, त्यानंतर नवीन उत्तर पर्यायावर क्लिक करा आणि नंतर **'Save and Next'** बटनावर क्लिक करा.

**(13) सुरक्षित केलेले प्रश्न किवा उत्तर दर्शवल्यानंतर पडताळणीसाठी खूण केलेले प्रश्नच केवळ मुल्यांकनासाठी विचारात घेतले जातील.**

(14) परीक्षार्थ्यांना 'परीक्षा प्रशासकाच्या' सूचनांचे काळजीपूर्वक पालन करण्याची विनंती आहे. जर एखादा परीक्षार्थी सूचनांचे/नियमांचे पालन करीत नसेल, तर तो गैरवर्तणुकीचा/अप्रामाणिक मार्गाच्या अंगिकाराचा प्रकार समजला जाईल आणि असा परीक्षार्थी MSCE ने ठरविलेल्या कालावधीसाठी परीक्षांना बसण्यास अपात्र ठरला जाईल.

(15) केवळ परीक्षा प्रारंभ होण्यापूर्वी परीक्षार्थी परीक्षा प्रशासकांना त्यांच्या शंका किंवा प्रश्न विचारू शकतात. परीक्षा प्रारंभ झाल्यानंतर कोणत्याही शंकेचे समाधान केले जाणार नाही.

(16) 120 मिनिटे संपल्यानंतर परीक्षार्थ्यांना एकही प्रश्न सोडवता येणार नाही किंवा त्यांच्या उत्तरांची पडताळणी करता येणार नाही. जरी परीक्षार्थीने 'submit' बटन क्लिक केले नसले तरीही त्याच्या/तिच्या उत्तरांना संगणक प्रणाली आपोआप सुरक्षित (save) करेल.

(17) **कृपया लक्षात घ्या-**

- **(1) प्रत्यक्ष परिक्षेची वेळ संपल्याशिवाय परीक्षार्थ्यांना पेपर 'अंतिमतः सबमिट' (finally submit) करू दिले जाणार नाही.**
- **(2) एकदा परीक्षा प्रारंभ झाली की कोणत्याही परिस्थितीत परीक्षार्थ्याने की-बोर्ड ची कोणतीही key क्लिक करू नये, कारण त्यामुळे परीक्षाच बंद होईल.**

## (ब) सर्वसामान्य सूचना

(1) कृपया प्रवेशपत्रावर दर्शविलेले दिनांक, रिपोर्टिंग वेळ आणि परीक्षास्थळाचा पत्ता याची नीट दखल घ्या.

(2) तुम्ही ऑनलाईन परीक्षेच्या केंद्राची निश्चिती करण्यासाठी एक दिवस अगोदर परीक्षा केंद्र पाहून यावे, जेणेकरून परीक्षेच्या दिवशी तुम्ही तिथे वेळेवर (प्रवेश पत्रावर छापलेल्या) पोहोचू शकाल. उशीरा येणा-यांना प्रवेश दिला जाणार नाही.

(3) तुमचा नवीनतम फोटोग्राफ चिकटवलेले प्रवेशपत्र तुम्हाला परीक्षा स्थानी आणावयाचे आहे. (शक्यतो तोच फोटो जो तुम्ही अपलोड केला)

(4) परीक्षाकेंद्रावर तुम्हाला परीक्षा प्रशासक आणि MSCE चे प्रतिनिधि यांच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे. सूचनांचे उल्लंघन केले गेल्यास तुम्हाला अपात्र गणले जाईल आणि परीक्षाकेंद्र सोडून जाण्यास सांगितले जाईल.

(5) गणकयंत्र (स्वतंत्र किंवा घडयाळासह), पुस्तके, वह्या किंवा लिखित कागद, सेलफोन (कॅमेरा सुविधेसह/शिवाय) किंवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक यंत्र (उपकरण) यांचा वापर परीक्षेच्या कालावधीत करू दिला जाणार नाही.

(6) कृपया आपल्या सोबत नवीनतम फोटो चिकटवलेले प्रवेशपत्र आणि सध्या वैध, मूळ स्वरुपातील फोटो ओळख पत्र (जसे की, पॅन कार्ड/पारपत्र/वाहन चालक परवाना/फोटोसहित मतदार ओळख पत्र/ गॅझेटेड अधिका-याच्या किंवा लोकप्रतिनिधिच्या सहीचे अस्सल लेटरहेडवरील फोटो ओळख पत्र/मान्यता प्राप्त महाविद्यालयाने/विश्वविद्यालयाने दिलेले ओळख पत्र (चालू वर्षासाठी स्विकारण्यायोग्य)/फोटोसहित आधारकार्ड/कर्मचारी ओळख पत्र) आणावे. आवेदन पत्रावर असणारे नाव (ऑनलाइन नोंदणीच्या वेळी जे उमेदवाराने दिलेले असते) फोटो-ओळख पत्रावरील नावाशी तंतोतंत जुळावयास हवे. विवाहानंतर ज्या महिला उमेदवारांचे पहिले/मधले/अंतिम नाव बदलले आहे त्यांनी ह्याची खास दखल घ्यावी. जर आवेदन पत्रावरील आणि फोटो-परिचय पत्रावरील नावात काहीही फरक असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही. **कृपया लक्षात घ्या - रेशन कार्ड आणि वाहनचालक शिकाऊ परवाना या परिक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.** ज्या उमेदवारांनी आपल्या नावात बदल केला असेल, अशा उमेदवारांनी राजपत्रित अधिसूचना/विवाह प्रमाणपत्र/शपथपत्र उपस्थित केले तरच त्यांना परिक्षेस बसण्यास अनुमती देण्यात येईल.

(7) बायोमेट्रिक डाटा (अंगठ्याचा ठसा) आणि फोटो परीक्षेच्या ठिकाणी घेतला जाईल. बायोमेट्रिक डाटा च्या सत्यता पडताळणीचा अंतिम निर्णय (जुळतो अथवा जुळत नाही) MSCE चा असेल व उमेदवारांना बंधनकारक असेल**. बायोमैट्रिक डाटा परीक्षा दरम्यान कधीही घेण्यास/सत्यता पडताळणीस विरोध केल्यास उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल**. या संदर्भात खालील मुद्दे लक्षात घ्या :

(क) जर बोटांवर कसलाही थर असेल (शाई/मेहंदी/रंग इत्यादी) तर धुवून टाका आणि परिक्षेच्या दिवसाआधी तो थर संपूर्णपणे गेला आहे याची खात्री करून घ्या.

(ख) जर बोटांना मळ किंवा धूळ लागली असेल तर बोटांचे ठसे (Finger prints) घेण्याआधी धुवून घ्या आणि हातांची बोटं सुकली आहेत याची खात्री करून घ्या.

(ग) दोन्ही हातांची बोट सुकलेली आहेत याची खात्री करा आणि जर बोट ओलसर असतील तर प्रत्येक बोट पूसा.

(घ) ठसा घेतल्या जाणा-या अंगठ्याला जर जखम/मार लागला असेल तर त्वरित परिक्षा केंद्रावर संबंधित अधिका-यास कळवा.

(या मुद्यांचे पालन करण्यास उमेदवार असमर्थ ठरल्यास परिक्षेस बसु दिले जाणार नाही.)

(8) तुम्ही दिलेल्या उत्तरांचे इतर परीक्षार्थ्यांच्या उत्तरांबरोबर उत्तरांच्या सारखेपणासाठी विश्लेषण केले जाईल. यासाठी अवलंब केलेल्या विश्लेषण प्रक्रियेतून जर उत्तरांची अदलाबदल केल्याचा व तुम्ही प्राप्त केलेले गुण वैध नसल्याचा निष्कर्ष आल्यास तुमची उमेदवारी रद्द केली जाऊ शकते. कोणीही परीक्षार्थी जर कॉपी करताना, सहाय्य घेताना किंवा देताना, किंवा परीक्षार्थ्यास न शोभणारी गैरवर्तणूक करताना आढळला तर त्याच्या उत्तरांची तपासणी केली जाणार नाही. MSCE अशा परीक्षार्थी विरूद्ध योग्य ती कारवाई करेल.

(9) तुम्ही स्वतः सोबत एक बॉलपॉईंट पेन आणावे. तुम्ही स्वतःचे व्यक्तिगत इंक स्टॅम्प पॅड (निळा/ काळा) सोबत आणू शकता. एक कागद तुम्हाला दिला जाईल ज्यावर तुम्ही कच्चे काम करू शकता किंवा उत्तर निवडण्यापूर्वी पुन्हा एकदा पडताळणी करावयाच्या प्रश्नांचे क्रमांक लिहू शकता. परीक्षा संपल्यावर कच्चे काम केलेले कागद प्रवेश पत्रासह पर्यवेक्षकाकडे जमा करावे.

(10) परीक्षेच्या व्यवस्थेमध्ये काही व्यत्यय येण्याची शक्यता पूर्णतः नाकारण्यात येणार नाही; ज्याचा परिणाम चाचणी वितरणावर आणि/किंवा निकाल तयार करण्यावर होऊ शकतो. अशा प्रसंगी असा व्यत्यय सुधारण्याचा पूर्णतः प्रयत्न केला जाईल, ज्यामध्ये उमेदवारांना एका जागेहून दुस-या जागेत हलविणे किंवा परीक्षेस विलंब होणे गृहित आहे. पुन्हा परीक्षा घेणे या बाबतचा निर्णय हा परीक्षा घेणा-या संस्थेचा/मंडळाचा निर्णय अंतिम असेल. उमेदवार पुन्हा परीक्षेसाठी कोणताही दावा करु शकणार नाही. ह्या विलंब झालेल्या प्रक्रीयेस उमेदवार जर हलण्यास तयार नसेल किंवा परीक्षा प्रक्रियेत भाग घेण्यास तयार नसेल अशा उमेदवारांना प्रक्रियेमधून संपूर्णपणे वगळण्यात येईल.

(11) जर परीक्षा एकाहून अधिक सत्रात घेतली गेली, तर वेगवेगळ्या सत्रात वापरलेल्या प्रश्नमालिकांच्या काठिण्यपातळीतील किंचित फरकांशी जुळवून घेण्यासाठी विविध सत्रातील प्राप्तांकांना 'इक्वेट' केले जाईल. जर नोड क्षमता कमी असेल किंवा एखाद्या केंद्रावर किंवा कोणत्याही उमेदवाराच्या बाबतीत काही तांत्रिक बिघाड घडला तर एकाहून अधिक सत्रांची आवश्यकता निर्माण होते.

(12) अपंग व्यक्तिंनी (PWD) त्यांच्या व्यवस्थेविषयीच्या माहितीसाठी परिक्षेच्या 30 मिनिटे आधी चाचणी केंद्र प्रशासकांशी संपर्क साधावा.

(13) कृपया नोंद घ्या, एक परिक्षार्थी केवळ एकदाच परिक्षा देऊ शकतो. एका पेक्षा अधिक वेळा परिक्षा दिल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल. जर परिक्षार्थीस एका पेक्षा अधिक प्रवेशपत्रे प्राप्त झाले असतील तर तुम्ही प्रवेश पत्रावर दिलेल्या दिनांक आणि वेळेनुसार केवळ एकदाच परीक्षा देऊ शकता.

(14) परीक्षेची सामग्री तथा त्याबद्दलची कोणतीही अन्य माहिती, संपूर्ण किंवा भागांमधे उघड करणे, प्रकाशित करणे, पुन्हाः निर्माण करणे, ट्रासमिट करणे, जमा करणे किंवा प्रसारण आणि जमा करणारे किंवा परिक्षाकेंद्रामधे दिला जाणारा कागद घेऊन जाणारे, किंवा परीक्षेच्या सामग्रीचा बेकायदेशीर बाळगण्यांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(15) भरतीच्या प्रक्रियेतील कोणत्याही वेळी, परिक्षार्थी द्वारा खोटी माहिती देणे/किंवा प्रक्रियेच्या नियमांचे उल्लंघन करण्याबाबतीत, परिक्षार्थीस भरती प्रक्रियेमधे अपात्र घोषित केले जाईल आणि भविष्यात MSCE कोणत्याही भरती प्रक्रिये मध्ये भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही. जर ह्या बाबतीत चालू असलेल्या प्रक्रियेमधे निदर्शनास आले नाही परंतु नंतर कधी लक्षात आल्यास त्याला प्रक्रियेच्या प्रथम सत्रापासूनच अपात्र ठरविण्यात येईल.

## INSTRUCTIONS WITH REGARD TO SOCIAL DISTANCING

1 **Candidate is required to report at the exam venue strictly as per the time slot mentioned in the Call Letter. Late comers will not be allowed to take the test.**

2 **Mapping of 'Candidate Roll Number and the Lab Number' will NOT be displayed outside the exam venue, but the same will be intimated to the candidates individually at the time of entry of the candidate to the exam venue.**

3 Items permitted into the venue for Candidates
**Candidates will be permitted to carry only certain items with them into the venue.**

   a. **Mask**
   b. **Personal hand sanitizer (50 ml)**
   c. **A simple pen and ink stamp pad (blue/black)**
   d. **Exam related documents Exam related documents (Call Letter and ID Card in Original)**
   e. **In case of Scribe Candidates - Scribe form duly filled and signed with Photograph affixed.**

**No other Items are permitted inside the venue.**

4 **Candidate should not share any of their personal belonging/material with anyone.**

5 **Candidate should maintain safe social distance with one another.**

6 **Candidate should stand in the row as per the instructions provided at venue.**

7 **If candidate is availing services of a scribe, then scribe also should bring their own Mask.**

8 **On completion of examination, the candidates should move out in an orderly manner without crowding as instructed by the venue staff.**

**WISH YOU GOOD LUCK**